नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०८/२०२५ (सोमवार)**

---

## ७ अल्पवयीन बालिकांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन आजीवन कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन बुटीबोरी:—फिर्यादी श्रीमती भारती कोडे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे अप. ९१/२०१७ कलम ३७६(२)(ड), ३५४(अ)(१),५०६ भादंवि सहकलम ६,१०,१७,२१ पोक्सो सह कलम ३(२)(v),३(२)(va),३(१),w(i),(ii), अनु. जा. ज. अ. प्रतिबंध अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील ७ पिडीत अल्पवयीन बालिका या बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीतील निवासी आश्रम शाळेत शिकत असताना नमुद शाळेतील चौकीदार आरोपी नामे **होमदेव उत्तम पडोळे, वय २५ वर्ष रा. ब्राम्हणी याने त्यांच्या सोबत लैंगिक अत्याचार केला आणि झालेला प्रकार कोणाला सांगितला तर** अल्पवयीन बालिकांना विविध **धमक्या दिल्या. नमुद प्रकरणी आरोपी विरूध्द पोस्टे** बुटीबोरी येथे ९१/२०१७ कलम ३७६(२)(ड),३५४(अ)(१),५०६ भादंवि सहकलम ६,१०,१७,२१ पोक्सो सह कलम ३(२)(V), ३(२)(Va), ३(१),W(i),(ii), अनु. जा. ज. अ. प्रतिबंध अधिनियम कायद्यान्वये कायद्यान्वये गुन्हा नोंद होता.

श्री विजय मराठे, उपविभागागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभागयांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ०४/०८/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश — १३ श्री जहिर अब्बास शेख यांनी वर नमुद **आरोपी नामे होमदेव उत्तम पडोळे, वय २५ वर्ष रा. ब्राम्हणी यास कलम**

**३७६(२) भादंवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रूपये दंड. दंड न भरल्यास २ महिने साधी कैद , कलम ५०६ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड न भरल्यास २ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सहायक फौजदार अनिल व्यवहारे ब.नं ६२० पो.स्टे. बुटीबोरी यांनी मदत केली आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये १९ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दिनांक ०३/०८/२०२५ रोजी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील आरोपीतांवर १९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** :— पोलीस स्टेशन खापा अंतर्गत आरोपी क्रं १) गौरव मनोहर जनबंधु, वय २१ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपूर, आरोपी क्र. ०२), हिमान्शु माणिक सोमकुवर, वय २० वर्ष, रा. भेंडाळा, ता. सावनेर, जि. नागपूर, आरोपी क्रं ३) साहील राजीव भलावी, वय १८ वर्ष, रा. भेंडाळा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि आरोपी क्रं ४) प्रतीत मनोज सहारे, वय १९ वर्ष, रा. वाकोडी, ता. सावनेर, जि. नागपूर, असे आरोपी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये प्रत्येकी १ असे ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी नामे आरोपी क्रं १) देंवाशु मदन बोखडे, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र ४, काकडे ले आउट ,नागमंदिर जवळ, वाघोडा सावनेर, आरोपी क्रं २) तेजस केदारनाथ आकोजवार, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र ४ ,सटवा माता मंदिर सावनेर, आणि आरोपी क्रं ३) वृषभ सिध्दार्थ मेश्राम, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र १४ शिवमंदीरच्या मागे, सावनेर हे बोरूजवाडा शिवार, रेल्वे बोगदा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ३ गुन्हे नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत आरोपी नामे आकाश चितांमन वाघाडे,वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र ०३ बुटीबोरी हा अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने,त्याचेवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत आरोपी क्रं १) हर्ष दिनेश बिहारी, वय २२ वर्षे, र. टाकळघाट, जुनी ग्रामपंचायत जवळ,ता. हिंगणा, जि. नागपुर आणि आरोपी क्रं २) शिवप्रताप जयबहादुर सिंह, वय ४५ वर्षे, रा. टेंभरी, रायभान दुबे, यांच्या घरी किरायाणे ता. हिंगणा, जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आरोपी क्रं १) अरशद आरीफ खान ,वय १८ वर्ष, रा.वार्ड न ०६ पिपरी कन्हान, त.पारशिवनी, आरोपी क्रं २) सुजल बाबुलाल गोलाईत, वय २१ वर्ष, रा. भिलगाव, त.कामठी, नागपुर.हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान:—** पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आरोपी विकासकुमार शामसुंदर भारती, वय २४ वर्ष, रा.नदीरा, ता. दुधये, जि. सोनभद्रे, उत्तर प्रदेश, ह.मु.कांद्री, कन्हान हा टेकडी गावाकडे जाणाऱ्या बसस्टॅड जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत आरोपी क्रं १) मोहम्मद अल्ताफ मोहम्मद इक्बाल अन्सारी, वय २१ वर्षे, रा. नुरी मस्जीद जवळ कूदनलाल गूप्ता नगर, डॉ. आबेडकर मार्ग नागपुर आणि आरोपी क्रं २) शहीद खान सलीम खान, वय २१ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, डॉ. कलीम दवाखाना जवळ, आंबेडकर मार्ग नागपुर हे अंमली पदार्थ सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत आरोपी नामे यश भिमराव रामटेके, वय २० वर्ष, रा. विरूर, त. राजुरा, जि.चंद्रपुर ह.मु. क्रिष्णा जुनघरे यांचे घरी किरायाने

पारशिवनी, जि. नागपूर, हा अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने,त्याचेवर एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन काटोल :—** पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत आरोपी क्रं १) धिरज कृष्णाजी भलावी, वय २५ वर्ष,रा. पेठ बुधवार, काटोल ,आणि आरोपी क्रं २) नितीन उर्फ निखील रमेशराव सावरकर, वय २८ वर्ष, रा. प्रेमनगर, काटोल ,आणि आरोपी क्रं ३) सचिन बबन मदनकर, वय २५ वर्ष रा. पेठ बुधवार, काटोल ,हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीतांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कुही :—** कुही पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी प्रकाश रविंद्र भोयर, वय २६ वर्षे, रा प्लॉट नं. ०४, गुरूकृपा नगर, हुडकेश्वर रोड नागपुर, हा मौजा मटकाझरी तलाव शिवार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने, नमुद आरोपीवर एन.डी.पी. एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०३/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०४/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री विजय माहुलकर , पोलीस उप अधिक्षक (गुह) नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन कुही अंतर्गत कुही आणि मांढळ येथे येथे श्री विजय माहुलकर यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन कुही येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच मांढळ बसस्टॉप येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.




डोळस क्लिनीक




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने